क्र.संगाबाअवि/७-ड/०९/४८७/२०२१
दिनांक : ४/१०/२०२१

प्रति,
प्राचार्य,
संलग्नित सर्व महाविद्यालये,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

विषय : वार्षिकांक स्पर्धा २०२०-२०२१
संदर्भ : १) विद्यापीठ अधिसूचना क्र.५७/२०२१, दि.१७/०६/२०२१
२) विद्यापीठ पत्र क्र.संगाबाअवि/७-ड/०९/४२८/२०२१, दि.७/९/२०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित अधिसूचनेव्दारे आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा २०२०-२१ करिता प्रकाशित करावयाच्या वार्षिकांकांच्या गुणांचे विभाजन कसे राहिल तसेच वार्षिकांक स्पर्धेकरिता वार्षिकांक कसा असावा, याबाबतचे निकष प्रसिध्द केलेले आहेत. स्पर्धेकरिता अंक ६ प्रतीत दि. ३०.०८.२०२१ पर्यंत विद्यापीठास पोहचतील अश्या बेताने पाठविण्याबाबत संदर्भांकित अधिसूचनेन्वये कळविण्यात आले होते. परंतु कोव्हीड २०१९ मुळे महाविद्यालयांकडुन अल्प प्रतिसाद मिळालेला आहे. करिता अंक पाठविण्याची मुदत दि.३०.०९.२०२१ पर्यंत वाढविण्यात आलेली होती. अद्यापही अंक कमीच प्राप्त झाल्यामुळे अंक पाठविण्याची मुदत **दि.२०.१०.२०२१ पर्यंत** वाढविण्यात येत आहे . सदर बाब आपले माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव कळविण्यात येत आहे. आपणांस विनंती करण्यात येते की, आपले महाविद्यालयाचे अंक **दि.२०.१०.२०२१ पर्यंत** सहा प्रतीत वार्षिकांक स्पर्धेकरिता विकास विभागाकडे पाठवावे.

आपला विश्वासू,

स्वा/-

कुलसचिव